**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.** 41

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.दिलीप अशोक देसाई
ए-२२, सरगम विहार अपार्टमेंट,
नागाळा पार्क, कोल्हापूर-४१६००३ — अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका,
जिल्हा कोल्हापूर — उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता, विभाग क्र.४,
ताराराणी मार्केट, कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १३६ / कोल्हापूर / २००६ |
| २ | सुनावणीची तारीख | दि.२३.१०.२००६ |

**३. उपस्थित**

**अपीलकर्ता** श्री.दिलीप अशोक देसाई
ए-२२, सरगम विहार अपार्टमेंट,
नागाळा पार्क, कोल्हापूर-४१६००३

**अपिलीय प्राधिकारी** तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका,
जिल्हा कोल्हापूर श्री.कुणालकुमार

**जन माहिती अधिकारी** तथा उपशहर अभियंता, विभाग क्र.४,ताराराणी मार्केट,
कोल्हापूर महानगरपालिका, जि.कोल्हापूर श्री.एम.एम.निर्मळे

| | |
|---|---|
| हिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.१.२००६ |
| हिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.२.२००६ |
| अपिलाची तारीख | दि. २१.२.२००६ |
| य प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.३.२००६ |

८ **मूळ र्तात मागणी केलेली माहिती**

कोल्हापूर महानगरपालिका विभागीय कार्यालय क्र.४, ताराराणी मार्केट कार्यक्षेत्रात सि.स.नं.२४६, रत्नोदय हौसिंग सोसायटी, बिल्डिंग ए, बी व सी यांना दि.६.१२.२००५ व नंतर दिलेल्या नोटीस मुंबई महानगरपालिका १९४९ अन्वये कलम २६०(१) कार्यवाही सि.स.नं.१८६/अ/१/१/ब/१ दिप्ती ग्रीन व्ह्यू अपार्टमेंटवर श्री.सतीश शहा यांनी अतिक्रमण केलेल्या सदनिका डी-२५,२६,२७ बाबत

अ)संबंधित अधिकारी यांनी केलेल्या पंचनाम्याची साक्षांकित झेरॉक्स प्रत देणेत यावी.

ब)आपल्या कार्यक्षेत्रामध्ये विनापरवाना बांधकाम होत आहे याची माहिती असूनही आपण कारवाई करणेस विलंब होत आहे, याला जबाबदार व कसूरवार अधिकारी कोण .

क)संबंधित जबाबदार अधिकारी यांचे नांव, पद आणि ते ज्या आदेशाने तेथे रुजू झाले त्या आदेशाची साक्षांकित प्रत .

## विवेचन

'रत्नोदय हौसिंग सासायटी ' व 'दिप्ती ग्रीन व्ह्यू अपार्टमेंट ' या गृहनिर्माण संस्थांमधील विनापरवाना बांधकाम व अतिक्रमण करणाऱ्यांना कोल्हापूर महानगरपालिकेने दिलेल्या नोटिशीनुसार केलेल्या कारवाईतील पंचनाम्याची साक्षांकित प्रत, विनापरवाना बांधकाम व अतिक्रमण होत असल्याची कल्पना असतानाही कारवाईला विलंब होत असण्यास जबाबदार अधिकारी कोण, आदी माहिती अपीलकर्ता श्री.दिलीप अशोक देसाई यांनी जन माहिती अधिकारी तथा उपशहर अभियंता, विभाग क्र.४, कोल्हापूर महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. पंचनाम्याची प्रत जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली नाही, ती देण्याची नजरचुकीने राहून गेल्याचे त्यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीत सांगितल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी नमूद केले आहे. नियमानुसार मुदतीत माहिती देण्याची दक्षता न घेतल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल, याची जाणीवही

अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका यांनी जन माहिती अधिकारी तथा उपशहर अभियंता, विभाग क्र.४, कोल्हापूर महानगरपालिका श्री.एम.एम.निर्मळे यांना दिली आहे. अपिलीय प्राधिकाऱ्यांनी प्रदीर्घ काळ अपिलाची दखल न घेतल्याच्या कारणावरुन व जन माहिती अधिकाऱ्यांना शास्ती लागू करण्याच्या मागणीसाठी श्री.देसाई यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

बेकायदेशीर बांधकामाविरुध्दच्या कर्तव्याचा भाग म्हणून आपण ही माहिती मागितली होती, परंतु ती वेळीच दिली गेली नाही. पंचनाम्याच्या साक्षांकित प्रती मिळाल्या नाहीत. वेळीच माहिती मिळाली असती तर बेकायदेशीर बांधकाम थांबविणे शक्य झाले असते, असे श्री.देसाई यांनी आयोगापुढील सुनावणीत नमूद केले. बेकायदेशीर बांधकाम होत असल्याची पूर्ण कल्पना अधिकाऱ्यांना होती, परंतु अधिकारी व कर्मचारी सामील असल्यामुळेच ही माहिती वेळेत देण्यात आली नाही. त्यामुळे अनधिकृत बेकायदेशीर बांधकाम थांबविण्याचा उद्देश पूर्ण झाला नाही व संबंधित जागी मोठ्या बेकायदेशीर इमारती उभ्या राहिल्या, असे प्रतिपादन श्री.देसाई यांनी लेखी व तोंडी केले. श्री.देसाई यांनी मागितलेली माहिती १५ वर्षांपूर्वीची आहे. त्यात त्यांचा कोणताही वैयक्तिक हक्क बाधित होत नसल्याचे सकृत्‌दर्शनी दिसून येते. तरीही आपण विहित मुदतीत माहिती देण्याचा प्रयत्न केला, असे समर्थन श्री.निर्मळे यांनी केले, परंतु त्याबाबतचे ठोस पुरावे ते देऊ शकले नाहीत. मागितलेली माहिती साधी होती, ती देणे फार परिश्रमाचे काम नव्हते, ती मुदतीत द्यावयास हवी होती, असे प्रतिपादन अपिलीय प्राधिकारी तथा आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका श्री.कुणालकुमार यांनी केले.

अपिलीय प्राधिकाऱ्यांचे निवेदन लक्षात घेता श्री.निर्मळे यांनी विनापरवाना बांधकामाच्या पंचनाम्याची प्रत मुदतीत देणे शक्य असूनही दिलेली नाही, हे स्पष्ट होते. दि.१७.१.२००६ रोजी श्री.देसाई यांनी माहिती मागणीचा अर्ज केला. दि.१५.२.२००६ रोजी काही माहिती त्यांना देण्यात आली व पंचनाम्याच्या प्रती दि.२८.३.२००६ राजी देण्यात आल्या, असे उभय बाजूंची निवेदने व सादर करण्यात आलेली कागदपत्रे यावरुन दिसून येते. याचाच अर्थ माहिती देण्यास ४० दिवस विलंब झाला आहे, व त्याबद्दल श्री.निर्मळे शास्तीस पात्र आहेत.

| | |
|---|---|
| ाहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि.१७.१.२००६ |
| ाहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १५.२.२००६ |
| अपिलाची तारीख | दि. २१.२.२००६ |
| लीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. १२.३.२००६ |

| | |
|---|---|
| ८ | **अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>कोल्हापूर महानगरपालिका विभागीय कार्यालय क्र.४, ताराराणी मार्केट कार्यक्षेत्रात सि.स.नं.२४६, रत्नोदय हौसिंग सोसायटी, बिल्डिंग ए, बी व सी यांना दि.६.१२.२००५ व नंतर दिलेल्या नोटीस मुंबई महानगरपालिका १९४९ अन्वये कलम २६०(१) कार्यवाही<br>सि.स.नं.१८६/अ/१/१/ब/१ दिप्ती ग्रीन व्ह्यू अपार्टमेंटवर श्री.सतीश शहा यांनी अतिक्रमण केलेल्या सदनिका डी-२५,२६,२७ बाबत<br>अ)संबंधित अधिकारी यांनी केलेल्या पंचनाम्याची साक्षांकित झेरॉक्स प्रत देणेत यावी.<br>ब)आपल्या कार्यक्षेत्रामध्ये विनापरवाना बांधकाम होत आहे याची माहिती असूनही आपण कारवाई करणेस विलंब होत आहे, याला जबाबदार व कसूरवार अधिकारी कोण .<br>क)संबंधित जबाबदार अधिकारी यांचे नांव, पद आणि ते ज्या आदेशाने तेथे रुजू झाले त्या आदेशाची साक्षांकित प्रत . |

## विवेचन

'रत्नोदय हौसिंग सासायटी ' व 'दिप्ती ग्रीन व्ह्यू अपार्टमेंट ' या गृहनिर्माण संस्थांमधील विनापरवाना बांधकाम व अतिक्रमण करणाऱ्यांना कोल्हापूर महानगरपालिकेने दिलेल्या नोटिशीनुसार केलेल्या कारवाईतील पंचनाम्याची साक्षांकित प्रत, विनापरवाना बांधकाम व अतिक्रमण होत असल्याची कल्पना असतानाही कारवाईला विलंब होत असण्यास जबाबदार अधिकारी कोण, आदी माहिती अपीलकर्ता श्री.दिलीप अशोक देसाई यांनी जन माहिती अधिकारी तथा उपशहर अभियंता, विभाग क्र.४, कोल्हापूर महानगरपालिका यांच्याकडे मागितली होती. पंचनाम्याची प्रत जन माहिती अधिकाऱ्यांनी दिली नाही, ती देण्याची नजरचुकीने राहून गेल्याचे त्यांनी प्रथम अपिलाच्या सुनावणीत सांगितल्याचे अपिलीय प्राधिकाऱ्यांनी नमूद केले आहे. नियमानुसार मुदतीत माहिती देण्याची दक्षता न घेतल्यास दंडात्मक कारवाई करण्यात येईल, याची जाणीवह

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

(१) अपील मान्य.

(२) माहिती देण्यात ४० दिवस विलंब झालेला असल्यामुळे माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कलम २० मधील तरतुदीनुसार प्रती दिवशी रु.२५०/- प्रमाणे १०,०००/- रुपये शास्ती जन माहिती अधिकारी तथा उप शहर अभियंता, विभाग क्र.४, कोल्हापूर महानगरपालिका श्री.एम.एम.निर्मळे यांना लावण्यात येत आहे. ही शास्ती त्यांच्या जून महिन्यात मिळणाऱ्या मे महिन्याच्या पगारातून वसूल करुन ती दि.१०.६.२००८ पर्यंत '००७, इतर प्रशासकीय सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७००१६१)' या लेखाशिर्षाखाली जमा करणाची कार्यवाही आयुक्त, कोल्हापूर महानगरपालिका, कोल्हापूर यांनी करुन, तसेच याबाबत त्यांच्या गोपनीय अहवाल व सेवापुस्तकात याबाबत नोंदी घेऊन त्याचा पूर्तता अहवाल आयोगाला दि. १५.६.२००८ पर्यंत सादर करावा.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि.३०.४.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणें खंडपीठ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.
दि. २.४.२००८.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्र** | **:पुणे / १३८+१३९** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.गिरीष द. सहस्त्रबुध्दे<br>ब्लॉक नं.९, शर्मिली अपार्टमेंट, सुवर्णाबाग कॉलनी,<br>कोथरुड, पुणे-३८ |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :कर्मचारीवर्ग अधिकारी,महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,<br>पुणे विभाग, विभागीय कार्यालय, पुणे-३७ |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :विभाग नियंत्रक, महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ,<br>पुणे विभाग, विभागीय कार्यालय, पुणे-३७ |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता, उभय बाजूंचे माहितीबाबत एकमत झाले. अपीलकर्त्यास यापूर्वी अंशतः माहिती दिली होती. ऊवरित माहिती समक्ष दिली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपिले निकाली काढण्यात येत आहेत.

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
पुणे खंडपीठ

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.
दि.२.४.२००८.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्र** | **:पुणे / १४०** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.भारत विठ्ठल सरोदे<br>रमाईनगर, मु.पो.दौंड, ता.दौंड, जि.पुणे |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :तालुका कृषी अधिकारी, दौंड, ता.दौंड, जि.पुणे |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :उपविभागीय कृषी अधिकारी, बारामती,<br>ता.बारामती, जि.पुणे |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता उभय बाजूंचे एकमत झाले. माहिती पूर्वीच दिली आहे असे दोन्ही बाजूंनी मान्य केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि. १९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १४२ / पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री. जयप्रकाश विठ्ठलराव मोरे<br>डी-१०२, मनीष दर्शन, फातिमा नगर, पुणे-४११ ०१३ |
| ३ | जन माहिती अधिकारी | सहाय्यक संचालक, शिक्षण संचालनालय (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | शिक्षण संचालक, (उच्च शिक्षण) महाराष्ट्र राज्य, पुणे |

अपीलकर्ता गैरहजर. वेतन विषयक माहितीची मागणी केली आहे. देयके व गट विमा योजनेच्या रकमेवरील १४ टक्के व्याज ही मुख्य मागणी आहे. ही सर्व देयके जन माहिती अधिकारी, अपिलीय प्राधिकारी यांनी अपीलकर्त्यास दिली आहेत. अपीलकर्त्याच्या अन्य मागण्या या कार्यवाही करण्याबाबत आहेत. हा विषय माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२८ .४.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१८.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्रमांक** | **:१५१ / कोल्हापूर / २००६** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.राजेंद्रकुमार रघुवेल समुद्रे<br>क-|| कोडोली (भोसल की नजिक),<br>ता.पन्हाळा, जि.कोल्हापूर-४१६११४ |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :शिक्षणाधिकारी ( माध्यमिक ), जिल्हा परिषद, कोल्हापूर |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, कोल्हापूर |

अपिलार्थी समक्ष हजर होते. अपीलकर्त्यांनी मागणी केलेली माहिती वेळेत दिली असल्याचे माहिती अधिकारी व अपिलीय अधिकारी यांनी नमूद केलेले आहे. तसेच माहिती मिळाली असून तक्रार राहिली नसल्याचे अपीलकर्त्याने प्रथम अपिलाच्या वेळी लेखी नमूद केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

## आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२५.४.२००८**

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र, पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि. १८.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १५२ / पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री. विश्वास हेरंब धडफळे<br>७८, पाषाण, पुणे - ४११ ००८ |
| ३ | जन माहिती अधिकारी | उपविभागीय अधिकारी, हवेली उपविभाग, पुणे<br>जिल्हाधिकारी कार्यालय आवार, पुणे-१ |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | जिल्हाधिकारी, पुणे |

अपीलकर्ता गैरहजर. याबाबत मा. राज्य मुख्य माहिती आयुक्तांनी दि. २९.६.२००६ रोजी निर्णय देऊन अपील निकाली काढले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील काढून टाकण्यात येत आहे.

**पुणे**
**दि. २.४.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

---

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्रमांक** | **:१६२ /कोल्हापूर /२००६** |
| **१.** | **अपीलकर्ता/माहिती अधिकारी** | :चेअरमन / सचीव, श्री ज्योतीर्लिंग सहकारी दूध व्यवसायिक संस्था मर्यादित, केंबाळी, पो.बचनी, कोल्हापूर, जि.कोल्हापूर |
| २. | **माहिती अर्जदार- मागणी** | :श्री.शहाजी शामराव पाटील मु.केंबळी, कोल्हापूर |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :जिल्हा दुग्धव्यवसाय विकास अधिकारी, कोल्हापूर |

माहितीचा अधिका अधिनियम २००५ सहकारी संस्थेला लागू होत नसल्याचे संस्थेच्या प्रतिनिधींचे म्हणणे आहे. सहकार कायद्यानुसार संस्थेच्या सभासदाला माहिती देणे बंधनकारक असल्याचे निवेदन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी केले. कोणतेही अनुदान व सवलती मिळत नसल्यामुळे त्या संस्थांना माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नसल्याचे राज्य मुख्य माहिती आयुक्त यांच्या आदेशात पूर्वी मान्य करण्यात आलेले आहे. तसेच प्रथम अपील केल्याचेही दिसून येत नाही.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

**पुणे**
**दि.२९.४.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ) यांच्यासमोर**
माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मंजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.
दि. ४.४.२००८.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्र** | **:१६५/सांगली** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.हसनमहंमद अ.करीम इनामदार<br>मिरज मालगाव रोड, सुभाषनगर, प्लॉट नं.अ-१३, सांगली |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :उप-कार्यकारी अभियंता, उपविभागीय कार्यालय,<br>शनिवार पेठ, महावितरण मिरज, जि.सांगली |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :कार्यकारी अभियंता, महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी,<br>मिरज, सांगली शहर, जि.सांगली |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता वीज कनेक्शनबाबत कार्यवाही व त्या अनुषंगाने कागदपत्रांची माहिती, माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेबाहेरील विषय आहे. अन्य माहिती दिली आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील अमान्य.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौंसिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री.नंदकुमार सर्जेराव कुंभार
शंतनु सर्व्हिसिंग सेंटर बहे रोड,
इस्लामपूर, ता.वाळवा, जि.सांगली — अपीलकर्ता

विरुध्द

**अपिलीय प्राधिकारी** तथा जिल्हा निबंधक सहकारी संस्था, सांगली

**जन माहिती अधिकारी** तथा पलूस सहकारी बँक लि.पलूस,
ता.पलूस, जि.सांगली — उत्तरवादी

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १६७ / सांगली / २००६ |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | दि. १२.७.२००६ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | दि. १७.७.२००६ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | दि. - |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | दि. - |
| ६ | **मूळ अर्जात मागणी केलेली माहिती**<br><br>अपीलकर्त्याने कर्ज मिळण्यासाठी दि.२५.३.२००६ रोजी केलेल्या कर्जाच्या अनुषंगाने. | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री.नंदकुमार सर्जेराव कुंभार यांनी पलूस सहकारी बँक लि., इस्लामपूर यांचेकडेस कर्ज मिहण्यासाठी दि.२५.३.२००६ रोजी केलेल्या अर्जाच्या अनुषंगाने माहिती मागितली

होती. प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने श्री.कुंभार यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील दाखल केले आहे.

आयोगाकडे प्राप्त झालेल्या अपिलांच्या अनुषंगाने आयोगाने दि.२७.२.२००८ रोजीच्या पत्रान्वये सदर अपील विशेष अपील निर्गत कार्यक्रमांतर्गत ठेवले असल्याचे श्री.कुंभार यांना कळविण्यात आले असता माहिती मिळाली असल्यामुळे प्रस्तुत अपील निकाली काढण्याबाबत दि.४.४.२००८ रोजीच्या पत्रान्वये कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**पुणे**
**दि.१० .४.२००८**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.
दि. ५.४.२००८.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्र** | **:१६८ / सांगली** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.विश्वास रा. भोसले<br>१४८१, रिसाला रोड, सांगली-४१६४१६ |
| २. | **जन माहिती अधिकारी** | : जिल्हा क्रिडा अधिकारी, पुणे |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :प्र.उपसंचालक, पुणे विभाग, पुणे |

अपीलकर्ता गैरहजर, माहिती दिली आहे. अपीलकर्ता वारंवार तीच मागणी करतात व प्रथम अपिलाच्या सुनावणीला उपस्थित रहात नाहीत, असे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी केले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.
दि. ३.४.२००८.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्र** | **:१६९/सांगली** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.विश्वास रावसाहेब भोसले<br>१४८१, रिसाला रोड, सांगली-४१६४१६ |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :सहाय्यक संचालक,<br>क्रिडा व युवक सेवा संचालनालय, पुणे, |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :संचालक, क्रिडा व युवक सेवा संचालनालय, पुणे, |

अपीलकर्ता गैरहजर, माहिती दिली आहे. अपीलकर्ता वारंवार तीच मागणी करतात व प्रथम अपिलाच्या सुनावणीला उपस्थित रहात नाहीत, असे निवेदन जन माहिती अधिकारी यांनी केले आहे.
आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

अपील निकाली काढण्यात येत आहे.

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र * पुणे खंडपीठ *

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

श्री. संजय खंडूजी खरात
द्वारा श्री. डी.व्ही. भांगरे
सर्व्हे क्र.३१/९, मिलिंद निवास,
चौधरी नगर, धानोरी, पुणे- १५

अपीलकर्ता

**विरुध्द**

**अपिलीय प्राधिकारी** तथा
अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे

उत्तरवादी

**जन माहिती अधिकारी** तथा
अधीक्षक भूमि अभिलेख, पुणे

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७०३ / पुणे |
| २ | जन माहिती अधिका-याकडे अर्ज केल्याची तारीख | ४.१.२००७ |
| ३ | जन माहिती अधिका-याने उत्तर दिल्याची तारीख | २३.११.२००७ |
| ४ | प्रथम अपिलाची तारीख | १.१२.२००७ |
| ५ | अपिलीय प्राधिका-याने निर्णय दिल्याची तारीख | -- |
| ६ | मूळ अर्जात मागणी केलेली माहिती<br><br>मौजे आमोंडी, ता. आंबेगांव, जि. पुणे येथील फेरफार क्र. ४०८७ चे नोंदीविरूध्द महाराष्ट्र जमीन महसूल अधिनियम १९६६ चे कलम २४७ अन्वये अपील क्र. एकत्रि/अपील क्र. १६५/१९४/९५ दि. २३.११.१९९९ ची धारिका मिळणेबाबत | |

## विवेचन

अपीलकर्ता श्री. संजय खंडूजी खरात यांनी अधीक्षक, भूमि अभिलेख, पुणे यांचेकडे अपील क्र.एकली/अपील क्र. १६५/१९४/९५ दि. २३.११.९९ च्या धारिकेची नक्कल मागितली होती. जन

माहिती अधिकारी व अपिलीय प्राधिकारी यांच्याकडून प्राप्त माहितीने समाधान न झाल्याने श्री. खरात यांनी राज्य माहिती आयोगाकडे अपील केले आहे.

संदर्भित अपिलाच्या अनुषंगाने माहिती मिळाली असल्याने अपील मागे घेत असल्याचे अपीलकर्त्याने दि. ११.३.२००८ रोजीच्या पत्रान्वये आयोगाला कळविले आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

<u>आदेश</u>

अपील निकाली काढण्यात येत आहे.

(विजय कुवळेकर)
राज्य माहिती आयुक्त,
पुणे खंडपीठ

पुणे
दि. २१.४.२००८

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ ) यांच्यासमोर**
**माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतच्या 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि. १८.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७१ / पुणे |
| २ | अपीलकर्ता | श्री. अशोक माधव पिंगळे ( सौ. सु.अ.पिंगळे तर्फे)<br>फ्लॅट क्र. २९, मारूती कॉम्प्लेक्स, औंध गाव, पुणे-७ |
| ३ | जन माहिती अधिकारी | अध्यक्ष, प्रियदर्शनी महिला औद्योगिक सहकारी संस्था मर्यादित, ५४, औंध गाव, पुणे- ७ |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | उपनिबंधक सहकारी संस्था, पुणे शहर-४, साखर संकुल, शिवाजीनगर, पुणे-५ |

वरील अपीलकर्ता व अपिलीय प्राधिकारी यांचेमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता उभय बाजूंचे माहितीबाबत एकमत झाले. अपीलकर्त्यास माहिती मिळणे संदर्भात कार्यवाही करण्याचे प्रथम अपिलीय प्राधिकारी यांनी मान्य केले.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. द्यावयाची राहिलेली अपीलकर्त्यास द्यावी व तसा पूर्तता अहवाल अपिलीय प्राधिकाऱ्यांनी दि. १२.४.२००८ पर्यंत आयोगास सादर करावा.

**पुणे**
दि. २.४.२००८

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र पुणे खंडपीठ

( विजय कुवळेकर )
राज्य माहिती आयुक्त,
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, (पुणे खंडपीठ ) यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉलसमोर, पुणे ४११ ००१

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि. १९.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश होता.

| | | |
|---|---|---|
| १ | अपील क्रमांक | १७३ / सोलापूर |
| २ | अपीलकर्ता | श्री. सुभाष बाबुराव जाधव<br>एस.टी.स्टँड समोर, कुर्डुवाडी, ता. माढा, जि.सोलापूर |
| ३ | जन माहिती अधिकारी | आस्थापना लिपिक, नगरपरिषद, कुर्डुवाडी, ता.माढा,जि.सोलापूर |
| ४ | अपिलीय प्राधिकारी | मुख्याधिकारी, नगर परिषद कुर्डुवाडी, ता.माढा, जि. सोलापूर |

वरील तीनही घटकांमधील चर्चा, त्यांनी सादर केलेली निवेदने व चर्चेअंतीचा निष्कर्ष विचारात घेता उभय बाजूंचे माहितीबाबत एकमत झाले. माहिती दिलेली आहे, असे दिसते. मात्र कालबध्द पदोन्नतीचा लाभ मिळावा, वगैरे मागण्या माहितीचा अधिकार अधिनियम २००५ च्या कक्षेत येत नाहीत. त्यामुळे पुढीलप्रमाणे आदेश देण्यात येत आहे :

**<u>आदेश</u>**

१. अपील निकाली काढण्यात येत आहे.

२. द्यावयाची राहिलेली माहिती दि. ३०.४.२००८ पर्यंत जन माहिती अधिकाऱ्यांनी द्यावी व तसा पूर्तता अहवाल आयोगास सादर करावा.

**पुणे**
**दि. १.४.२००८**

राज्य माहिती आयोग पुणे खंडपीठ

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**

**राज्य माहिती आयुक्त, राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र राज्य, पुणे खंडपीठ यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम २००५ कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील.**

राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ
नवीन प्रशासकीय इमारत, चौथा मजला,
कौन्सिल हॉल समोर, पुणे ४११ ००१.

राज्य माहिती आयोगाच्या पुणे खंडपीठातर्फे सप्टेंबर २००६ पर्यंतचा 'विशेष अपील निर्गत कार्यक्रम' आयोजित करण्यात आला होता. त्यात दि.१८.३.२००८ रोजी खालील अपिलाचा समावेश आहे.

| | | |
|---|---|---|
| | **अपील क्र** | **:१७४/सांगली/२००६** |
| १. | **अपीलकर्ता** | :श्री.अरुण जिन्नाप्पा गनोर<br>मु.पो.आजरा, ता.मिरज, जि.सांगली |
| २. | **जन माहिती अधिकारी** | :कार्यकारी संचालक, श्री रेणुका शुगर्स लि. मोहननगर,<br>आरग, ता.मिरज, जि.सांगली |
| ३. | **अपिलीय प्राधिकारी** | :प्रादेशिक सहसंचालक (साखर) कोल्हापूर,<br>राजारामपुरी, १ ली गल्ली, जि.कोल्हापूर |

जन माहिती अधिकारी व अपीलकर्ता गैरहजर. श्री रेणुका शुगर्स लि. मोहननगर यांच्या संदर्भातील माहिती मागितली असून या खाजगी संस्थेला माहितीचा अधिकार अधिनियम २००५ लागू होत नाही, असे संस्थेचे म्हणणे आहे. प्रकृती अस्वास्थ्यामुळे पुढील तारीख देण्याची विनंती जन माहिती अधिकाऱ्यांनी केली आहे. नियमानुसार देय माहिती अपिलीय प्राधिकाऱ्यांनी संबंधित संस्थेकडून घेऊन अपीलकर्त्यास देणे आवश्यक आहे.

आयोगाचा आदेश पुढीलप्रमाणे :

**आदेश**

(१) अपील निकाली काढण्यात येत आहे.

(२) सहा मुद्यांपैकी मुद्दा क्र.६ ढोबळ स्वरुपाचा आहे. तो वगळता अन्य मुद्यांमधील देय माहिती जन माहिती अधिकाऱ्यांकडून प्राप्त करुन घेऊन अपिलीय प्राधिकाऱ्यांनी अपीलकर्त्यास पुरवावी.

**पुणे**
**दि.२५.४.२००८**

**( विजय कुवळेकर )**
**राज्य माहिती आयुक्त,**
**पुणे खंडपीठ**